# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411018
## मा. फ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक – ०३

दिनांक:- 04/07/2019 वेळ. सकाळी 11.30 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि. 04/07/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजर्षी शाहु महाराज सभागृहात** " आयोजित करणेत आली आहे. सदर सभेस खालील प्रमाणे कामकाज होईल.

अ) दि. 03/06/2019 रोजी झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक 02) कायम करणे.

विषय क्रमांक – 1. फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात हॉकर्स झोनचे निश्चित केलेल्या ठिकाणास नेमणेत आलेल्या उपसमिती मार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन हॉकर्स ठिकाणे निश्चित करणेत आलेली आहेत. सदर ठिकाणांना मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेत येऊन सदरचा विषय शहर फेरीवाला समितीकडे अंतिम मान्यते कामी सादर करावयाचा असल्याने मान्यता देणेबाबत विचार करणे.

(सोबत हॉकर्स झोन निश्चित केलेल्या ठिकाणांची प्रभागनिहाय यादी.)

(दिनांक 4/7/2019 चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक - 2. फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. 11 मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार) १) लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर२) समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली, भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती यांनी दि. 01/01/2019 चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

दिनांक 23/01/2019 रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण - मोरवाडी, जयभगवान महासंघ - पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी पिंपळे गुरव या यांनी दि. 16/01/2019 व 21/01/2019 चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंढे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही संस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणाबाबतचा विषय नजीकच्या मा. प्रभाग समिती सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करणेत यावा.

(दिनांक 4/7/2019 चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

Scanned by CamScanner

विषय क्रमांक ३ मा. क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव पत्र क्र फक्षेका/ २ /कावि/४५१ /२०१९
दिनांक-०१/०७ /२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'फ' क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पेठ क्र. २० चिखली कृष्णानगर येथील भाजीमंडई मधील एकुण १३९ गाळे वितरण करणेसाठी सदर गाळ्यांवर अतिक्रमण करुन व्यवसाय करीत असलेले विक्रेते यांचे सर्व्हेक्षण करून यादी अंतिम करावी व त्यास मा.प्रभाग समितीची मान्यता घेऊन भुमि आणि जिंदगी, मुख्य कार्यालय विभागाकडे पाठविणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी क्रमांक भुजि/कावि/ १४४/२०१९ दिनांक ०६/०६/२०१९ अन्वये निर्देश दिलेले आहेत.

मा. आयुक्त सो. यांचे निर्देशानुसार 'फ' क्षेत्रिय कार्यालयामार्फत दिनांक १२/०६/२०१९ रोजी सर्व्हेक्षण केले परंतू जे व्यावसायिक जागेवर अनुपस्थित होते त्यांची पाहणी दिनांक १८/०६/२०१९, २०/०६/२०१९, २८/०६/२०१९ आणि ०१/०७/२०१९ रोजी केली असता पेठ क्र. २० चिखली कृष्णानगर येथील भाजी मंडईमध्ये सोबतच्या यादीप्रमाणे गाळ्यांवर अतिक्रमण करुन व्यवसाय करीत असलेले १३८ विक्रेते आढळून आले असून गाळा क्रमांक ७४ व ७५ च्या मधील मोकळ्या जागेत श्रीमती शेरणा निलेश भोसले अनधिकृतपणे व्यवसाय करीत असलेचे आढळून आले आणि गाळा क्रमांक ९९ या गाळ्यावर कोणीही व्यवसाय करताना आढळले नाही तरी सदर १३९ विक्रेते यांची यादी अंतिम करून पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यालय भुमि आणि जिंदगी विभागाकडे पाठविणेस मान्यता देणे.

विषय क्रमांक - ४. मा.सभापती यांचे परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.

Radekar

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड
महानगरलिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी
क्रफक्षेका/सभा/कावि/18 /2019
दिनांक- 01 /07/2019

Scanned by CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी44
क्र.-फक्षेका/सभा/कावि/18 /2019
दिनांक – 01/07/2019

प्रति,

मा.------------------------------------
सदस्य,पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी – 411044

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि. 04/07/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक 04/07/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील **"राजर्षी शाहु महाराज सभागृहात"** आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. तरी आपण सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

आपली विश्वासू,

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरलिका

सुचना - सदर सभेस आपली उपस्थीती आवश्यक आहे. काही कारणास्तव शक्य नसल्यास प्रतिनीधीस पाठवावे.

प्रत – 1. संबंधित शाखाप्रमुख / विभागप्रमुख------------------------ विभाग
2. कार्यालयीन नोटिस बोर्ड

कृ. मागे पहा



Scanned by CamScanner